महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ ०४ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०१३ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# विद्यार्थी योजनांमधील खोगीर भरतीला चाप

## फडणवीस सरकार घेणार मोठा निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** बार्टी, सारथी, महाज्योती आणि आर्टी अशा संस्थांमध्ये दरवर्षी शेकडो मुले प्रवेश घेत असतात. या विद्यार्थ्यांवर सरकारही कोट्यावधी रुपये खर्च करते. 2018 ते 2025 या काळात आतापर्यंत या संस्थांमधील विद्यार्थ्यांवर साधारण 750 कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. पण यातून मुलांना होणारा फायदा, त्यांना मिळणाऱ्या नोकऱ्या, त्यांच्याकडून सुरु करण्यात येणारे व्यवसाय या गोष्टी अत्यंत नगण्य आहेत. त्यामुळेच फडणवीस सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे.

### बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी संस्थांमध्ये यापुढे केवळ गुणवत्तेच्या आधारे प्रवेश – उपमुख्यमंत्री अजित पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पावसाळी अधिवेशनात बोलताना याबाबतची माहिती दिली. ते म्हणाले, बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये यापुढे विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारावर विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येणार आहेत. या संस्थांमधील विद्यार्थ्यांची संख्या, त्यांना देण्यात येणारी सर्वसाधारण शिष्यवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रिया या सगळ्यांबाबत समान धोरण राबवण्यात येईल.

सारथी संस्थेमध्ये 2018 ते 2025 या कालावधीत 83 अभ्यासक्रमांमध्ये 3 लाख विद्यार्थ्यांना शासनामार्फत विद्यावेतन, शिष्यवृत्ती आदी लाभ देण्यात आले. त्यापैकी 3 हजार म्हणजे केवळ 1 टक्का विद्यार्थ्यांनी पीएचडी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतला होता. त्या एक टक्का विद्यार्थ्यांसाठी 280 कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. 5 वर्षांत एका विद्यार्थ्यामागे 30 लाख रुपये खर्च झाला, ही बाब गांभीर्यानं घेण्यासारखी आहे. यामुळेच यापुढील काळात ज्या अभ्यासक्रमांच्या आधारे रोजगार मिळेल, अशाच अभ्यासक्रमांना साठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये विद्यार्थी संख्या, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती यांची संख्या ठरवणं आणि गुणवत्ता वाढ यासंदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल आता प्राप्त झालेला आहे. त्या संदर्भातलवकरच निर्णय घेण्यात येईल, अशीही घोषणा अजित पवार यांनी केली.



# गोळीबाराच्या घटनेने बदलापुरात खळबळ



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापुरात आमदार किसन कथोरे यांच्या बंगल्यासमोरील मुख्य रस्त्यावर गोळीबाराची घटना समोर आल्याने बदलापुरात एकच खळबळं उडाली आहे. गुरुवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास बदलापूर बोराडपाडा रस्त्यावर आमदार किसन कथोरे यांच्या बदलापुरातील निवासस्थानासमोरून जाणाऱ्या रस्त्यावर अल्ताफ शेख नामक इसमावर गोळीबार झाला आहे. चार जणांनी हा गोळीबार केला असून दोन गटातील वादातून हा हल्ला झाल्याचे बोलले जात आहे.

याप्रकरणी पोलिसांनी एकाला ताब्यात घेतले असून हा हल्ला कशासाठी करण्यात आला? यात किती जणांचा सहभाग याबाबत पोलिस अधिक तपास करीत असल्याची माहिती पोलिस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली. दरम्यान, बदलापूर पश्चिम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.




# खर्डी येथील जीवनदीप महाविद्यालयात युवक महोत्सव कार्यशाळा संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

विद्यार्थी विकास विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई आणि जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने ५८ व्या आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सवाची एकदिवसीय कार्यशाळा (ठाणे - पालघर जिल्हा ग्रामीण झोन VI) मंगळवार दि. ०१ जुलै २०२५ रोजी संपन्न झाली.

कार्यशाळेच्या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. या कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री.रविंद्र घोडविंदे (अध्यक्ष - जी. शै. सं.), मा.श्री. निलेश सावे - (मुंबई विद्यापीठ, सांस्कृतिक समन्वयक), सांस्कृतिक समन्वयक डॉ.जयश्री कवठेकर (ठाणे - पालघर जिल्हा ग्रामीण झोन VI),सांस्कृतिक सह समन्वयक डॉ. प्रकाश धुमाळ (ठाणे - पालघर जिल्हा ग्रामीण झोन VI), प्राचार्य कैलास कळकटे हे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा तसेच युवक महोत्सवात होणाऱ्या संगीत, नृत्य, नाट्य, विविध ललित कला इ.स्पर्धांचे प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले. 'विद्यार्थ्यांने केवळ बक्षीस मिळवण्यापेक्षा सतत स्वतःला घडवावे व आपला विकास करावा असे सांगून मुंबई विद्यापीठाचे, सांस्कृतिक समन्वयक श्री. निलेश सावे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने प्रात्यक्षिकेद्वारे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. सांस्कृतिक समन्वयक डॉ. जयश्री कवठेकर यांनी देखील मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे यांनी या कार्यशाळेच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

या कार्यशाळेसाठी झोन क्र.6 या विभागातील 16 महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रेश्मा घोडविंदे यांनी केले.

सांस्कृतिक विभागाचे प्रा. दिप्ती मोरे, प्रा.मिताली चौधरी, प्रा. देवयानी म्हस्कर, प्रा मृणाल वाघमारे प्रा. नामदेव मांजेतसेच तांत्रिक सहाय्य प्रा.विशाल भोसले, प्रा. भूषण विशे, डॉ. विनोद होले, प्रा. राहुल सोनावणे, प्रा. प्रियांका पवार यांनी केले. या कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जमिनीच्या फ्री होल्डमध्ये रूपांतरासाठी एसओपी

### – महसूल मंत्री बावनकुळे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** वर्ग २ मधून जमिनीचे फ्री होल्डमध्ये रूपांतर करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचा मुद्दा भाजप आमदार अमित साटम यांनी विधान सभेत उपस्थित केला. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घोषणा केली की वेळेत अर्ज पूर्ण करण्यासाठी सरकारतर्फे एसओपी तयार करण्यात येईल. यामुळे प्रलंबित प्रकरणे लवकर निकाली निघतील.

आमदार अमीत साटम म्हणाले की, वर्ग २ जमिनीचे फ्री होल्ड मध्ये रूपांतर करण्याची मागणी बऱ्याच काळापासून होत आहे. सरकारने सामान्य माणसाचे हित लक्षात घेऊन हा निर्णय घेतला. या इमारतींचा पुनर्विकास झाला पाहिजे असा निर्णय घेतला. प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. कायमस्वरूपी नियुक्त केलेले सरकारी अधिकारी अनेकदा सरकारला देय असलेल्या १० टक्के प्रीमियम व्यतिरिक्त स्वतःचे अनधिकृत शुल्क आकारतात. परिणामी मतदारसंघातील जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात अनेक प्रकरणे प्रलंबित राहतात. एका किंवा दुसऱ्या कारणावरून वारंवार प्रश्न उपस्थित करुन प्रकरणे लटकतात, असेही साटम म्हणाले.


एखादी संस्था भोगवटा वर्ग २ मधून फ्रीहोल्ड मध्ये रूपांतरित करण्यासाठी अर्ज करते, तेव्हा अर्जावर किती दिवसांत कारवाई करून निकाली काढला जाईल, असा प्रश्न साटम यांनी सरकारला विचारला. त्यावर सरकार एक एसओपी तयार करेल. त्यामध्ये अशा अर्जांच्या निकालासाठी स्पष्ट कालमर्यादा निश्चित केले जाईल. यामुळे सर्व प्रलंबित अर्जांची प्रकरणे लवकर निकाली निघतील. असे बावनकुळे म्हणाले

# बारवी धरण ५७ टक्के भरले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर ३ :** ठाणे जिल्ह्यात समाधानकारक पाऊस सुरू आहे. धरण परिसरातदेखील पाणीपातळीत वाढ झाली आहे. जिल्ह्याची तहान भागविणारे बारवी धरण ५७ टक्के भरले असून, मागील वर्षापेक्षा समाधानकारक स्थिती असल्याचे म्हटले जात आहे. मागील वर्षी याच दिवशी बारवी धरणात २७ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. बारवी धरणातील पाणीसाठ्यात वाढ होत असून, मागील २४ तासांत बारवी धरण परिसरात ६६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे धरणात १९३.१५ घनमीटर पाणीसाठा होता. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा धरणात जुलै अखेरीस ३० टक्के अधिकचा पाणीसाठा आहे.

पाऊस असाच सुरू राहिल्यास जुलैअखेरीस अथवा ऑगस्टच्या सुरुवातीला बारवी धरण भरेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.



काही दिवसांपासून ठाणे जिल्ह्यात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे ठाणे जिल्ह्याच्या जलाशयातील पाणीसाठ्यात वाढ होत आहे. नदी, नाले दुथडी भरून वाहू लागल्याने जिल्ह्याची तहान भागविणारे बारवी धरण कधी भरते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ठाणे जिल्ह्यातील बहुतांश शहरांना बारवी धरणातून पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे बारवी धरण पूर्ण क्षमतेने भरणे आवश्यक आहे. यंदाच्या वर्षात बारवी धरणातील पाणीसाठा मे महिन्यात २५ टक्क्यांपर्यंत खाली आला होता; मात्र सुदैवाने पाणीकपात करण्याची वेळ आली नाही. बारवी पाणलोट क्षेत्रात ३ जुलैला ६६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे धरणात १९३.१५ घन मीटर पाणीसाठा झाला असून, ५७ टक्के धरण भरले आहे.

# अठरा वर्षानंतर दोन भाऊ एकाच व्यासपीठावर

## वरळी डोममधील मेळाव्यासाठी ठाकरे गट आणि मनसेची जय्यत तयारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे एकत्र येणार असून 5 जुलै रोजी वरळीतील एनएससीआय डोममध्ये विजयी मेळाव्याच्या मंचावर दोन्ही ठाकरे बंधू एकत्र दिसतील. हिंदी भाषा पहिल्या इयत्तेपासून शिकवण्या संदर्भातील शासन आदेश रद्द करण्यासाठी दोन्ही सेनांनी 5 जुलै रोजी मोर्चा कढण्याचं आवाहन केलेलं. मात्र त्यापूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भातील दोन्ही शासन आदेश मागे घेत असल्याची घोषणा केली. त्यानंतर आता नियोजित तारखेलाच ठाकरे बंधू एकत्रितपणे विजयी मेळावा घेणार आहेत.



हिंदी सक्तीच्या निर्णयाविरोधात शिवसेना (उबाठा) व मनसेकडून जोरदार शक्तिप्रदर्शनाची तयारी होत असताना राज्य शासनाने अध्यादेश मागे घेण्याची घोषणा केल्यानंतर मोर्चाचे रूपांतर आता विजयी मेळाव्यात केले जाणार आहे. ५ जुलैला शिवसेना व मनसेचा संयुक्त मेळावा वरळी येथे होणार असून, नाशिकमधून दोन्ही पक्षांचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित राहणार आहे. शिवसेना भवनमध्ये बुधवारी (ता. २) झालेल्या बैठकीत याबाबत निर्धार करण्यात आला. वरळी येथील राष्ट्रीय क्रीडासंकुल (एनएसीआय डोम) येथे सकाळी दहाला मेळावा होणार असून आयोजित मेळाव्यास नाशिक जिल्ह्यातील हजारो शिवसैनिक वाजतगाजत गुलाल उधळत सहभागी होणार असल्याची माहिती शिवसेना उपनेते दत्ता गायकवाड, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी यांनी दिली. हिंदी सक्तीविरोधात मोर्चा रद्द झाल्यानंतर या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

वरळी येथील राष्ट्रीय क्रीडासंकुल (एनएसीआय डोम) येथे सकाळी दहाला मेळावा होणार असून आयोजित मेळाव्यास नाशिक जिल्ह्यातील हजारो शिवसैनिक वाजतगाजत गुलाल उधळत सहभागी होणार असल्याची माहिती शिवसेना उपनेते दत्ता गायकवाड, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी यांनी दिली. हिंदी सक्तीविरोधात मोर्चा रद्द झाल्यानंतर या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याच्या निमित्ताने तब्बल १८ वर्षांनंतर पहिल्यांदाच उद्धव ठाकरे व राज ठाकरे एकाच व्यासपीठावर दिसणार असल्याने शिवसैनिकात आनंदाचे वातावरण पसरले आहे. यामुळे दोन्ही पक्षाच्या कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांमध्ये मोठा जोश संचारल्याचे माजी आमदार वसंत गिते यांनी सांगितले.

### निकृष्ठ बांधकामामुळे

# शहापूर तालुक्यातील आरोग्य केंद्रांना गळती




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे -** ग्रामीण भागाच्या आरोग्यसेवेची धुरा सांभाळणारी व्यवस्था म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र ओळखली जातात. मात्र ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील अघई येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांसमवेतच चक्क शहापूर उपजिल्हा रुग्णालयाला देखील पावसामुळे गळती लागल्याचे उघड झाले आहे. यामुळे आधीच अपुऱ्या आरोग्य सोयींमुळे त्रस्त असलेल्या रुग्णांना आता गळक्या छताखाली उपचार घ्यावे लागत आहे. यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्याच्या शहरी भागात मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभारणीचे काम करण्यात येत आहे. वाहतूक, आरोग्य, शिक्षण यांसह अनेक कोट्यवधी रुपयांची कामे सूर आहेत. मात्र असे असतानाचा जिल्ह्याच्या ग्रामीण भागाकडे आणि विशेषतः आरोग्य व्यवस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे सातत्याने समोर आले आहे. ठाणे जिल्ह्याचा मोठा ग्रामीण भाग म्हणून शहापूर आणि मुरबाड हे दोन तालुके ओळखले जातात. या ग्रामीण भागाच्या आरोग्य व्यवस्थेमध्ये विविध त्रुटी असल्याचे अनेकदा निदर्शनास आले आहे.










# गीतासार



## अध्याय १५
## पुरुषोत्तमयोगः

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः । मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ १५-७ ॥

या देहात असणारा हा सनातन जीवात्मा माझाच अंश आहे आणि तोच प्रकृतीत स्थित मनाला आणि पाचही इंद्रियांना आकर्षित करतो. ॥ १५-७ ॥

शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः । गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात् ॥ १५-८ ॥

वारा वासाच्या वस्तूतून वास घेऊन स्वतःबरोबर नेतो, तसाच देहादिकांचा स्वामी जीवात्माही ज्या शरीराचा त्याग करतो, त्या शरीरातून मनसहित इंद्रिये बरोबर घेऊन नवीन मिळणाऱ्या शरीरात जातो. ॥ १५-८ ॥

श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च । अधिष्ठायं मनश्चायं विषयानुपसेवते ॥ १५-९ ॥

हा जीवात्मा कान, डोळे, त्वचा, जीभ, नाक आणि मन यांच्या आश्रयानेच विषयांचा उपभोग घेतो. ॥ १५-९ ॥

उत्क्रामन्तं स्थितं वापि भुञ्जानं वा गुणान्वितम् । विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः ॥ १५-१० ॥

शरीर सोडून जात असता किंवा शरीरात राहात असता किंवा विषयांचा भोग घेत असता किंवा तीन गुणांनी युक्त असताही (त्या आत्मस्वरूपाला) अज्ञानी लोक ओळखत नाहीत. केवळ ज्ञानरूपी दृष्टी असलेले विवेकी ज्ञानीच तत्त्वतः ओळखतात. ॥ १५-१० ॥

# घरफोडी करणाऱ्या सराईत चोरट्यास अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**भिवंडी :** भिवंडी शहरातील विविध भागात फिरून भंगार सामान गोळा करत असतानाच बंद असलेल्या घर आणि दुकानांची रेकी करून तेथे घरफोडी करणाऱ्या एका अट्टल चोरट्यांस पोलिसांनी मोठ्या शिताफीने माग काढून मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूर येथून ताब्यात घेऊन अटक केली आहे. त्याने परिसरात केलेल्या घरफोडीतील एक लाख रुपये किमंतीचे सहा लॅपटॉप पोलिसांनी हस्तगत केले असल्याची माहिती शांतीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे. सदर आरोपीला न्यायालयात हजर केले असता तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

गत आठवड्यात भिवंडी शहरातील गोपाळ नगर परिसरात असलेल्या एका वकिलाच्या कार्यालयात घरफोडी झाली होती त्यामुळे लॅपटॉप चोरी केल्या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद पाटील,सहाय्यक पोलिस निरीक्षक योगेश गायकर व पोलीस पथकातील संतोष मोरे,संतोष पवार,सैय्यद,किरण जाधव, दिनेश भुरकुड,रविंद्र पाटील,गणेश कांबळे, बर्वे, रोशन जाधव हे कर्मचारी करीत असताना शांतीनगर तसेच कचेरी पाडा या परिसरातील 70 हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे तपासत असताना एका संशयती आरोपीचा चेहरा निष्पन्न होताच मिळालेल्या माहीती वरुन तपास सुरू केला असता सदर आरोपी मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूर येथे असल्याचे समजताच पोलीस पथकाचे तेथे जाऊन आरोपी इमरान गफुर शेख (वय २४ रा.रहमतपुरा, शांतीनगर) यास शिताफीने ताब्यात घेवुन अटक करून त्याचेकडे चौकशी केली असता त्याने शांतीनगर भागातील घरफोडीच्या ४ गुन्ह्यांची कबुली दिली.त्याच्या जवळून घरफोडीत चोरी केलेलं १ लाख रुपये किमतीचे सहा लॅपटॉप हस्तगत करण्यात आले आहेत.अशी माहिती पोलिस निरीक्षक विनोद पाटील यांनी दिली आहे.घरफोडी करणारा चोरटा इमरान शेख हा भंगार गोळा करणारा असून भंगार गोळा करतानाच घर व कार्यालयांची रेकी करून तो घरफोडी करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

# पडघा विभागात मनसेच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**पडघा :** राजकीय दृष्ट्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या पडघा विभागात मनसेच्या वतीने ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना विविध मान्यवरांच्या उपस्थितीत वह्यांचे वाटप करण्यात आले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांचा वाढदिवस नुकताच साजरा करण्यात आला त्या निमित्ताने महाराष्ट्र नवनिर्माण माथाडी कामगार सेनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गुरुनाथ बाळु मते यांच्या मार्गदर्शनाखाली कुंरूद, दळेपाडा, हरीपाडा, आतकोली, चिंबीपाडा, डोहळे, वांद्रे, या सात जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मनसे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डी.के.म्हात्रे जिल्हा संघटक मदन आण्णा पाटील, भिंवडी लोकसभा जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी, तालुका अध्यक्ष विकास जाधव, माथाडी कामगार सेना जिल्हाध्यक्ष भरत पाटील तालुका संघटक नरेश शेलार विभाग अध्यक्ष सदानंद गोरले तालुका उपाध्यक्ष निलेश पाटील कैलास घागस,आदित्य पाटील, राकेश पाटील,कौस्तुभ फापे, बाळाराम फापे, गुरुनाथ मोरे, सचिन भोईर, हर्षद घागस, सुभाष बरफ नवनाथ सोनावणे, सुधीर पाटील, योगेश धनगर, दत्ता मोरे.सुभाष राऊत.किरण राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.तर मनसेच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आल्याने मनसे पदाधिकाऱ्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

### कल्याण विकास फाउंडेशनच्या अध्यक्षा
# हेमलता पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम

## रक्तदान शिबिर, डोळे तपासणी, संगणक प्रशिक्षण, महिला आरोग्य तपासणीसह करण्यात आली वृक्ष लागवड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर ग्रामिण :** विविध सामाजिक उपक्रम राबवत भाजप जुने कल्याण मंडळ महिला मोर्चा आणि कल्याण विकास फाउंडेशनच्या अध्यक्षा हेमलता नरेंद्र पवार यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. ज्यामध्ये रक्तदान शिबिर, डोळे तपासणी, महिलांसाठी संगणक प्रशिक्षण, महिला आरोग्य तपासणीसह वृक्ष लागवड करत सामाजिक संवेदना जपल्याचे दिसून आले.

हेमलता नरेंद्र पवार म्हटलं की कल्याण शहरात सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेल्या संवेदनशील महिला सामाजिक कार्यकर्त्या अशी त्यांची ओळख आहे. आणि आपल्या या सामजिक ओळखीला साजेसे अनेक उपक्रम राबवून त्यांचा आजचा वाढदिवस हा साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त सर्वप्रथम हेमलता नरेंद्र पवार यांनी पारनाका येथील श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेत आपल्या दिवसाची सुरूवात केली. इतकेच नाहीतर स्वामींच्या दर्शनानंतर त्याठिकाणी वृक्षारोपणही करण्यात आले.

त्यानंतर पारनाका येथील राजस्थान हॉलमध्ये आयोजित सामाजिक कार्यक्रमांमध्ये त्या माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या प्रमूख उपस्थितीत सहभागी झाल्या. याठिकाणी सरस्वती माता, छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना हेमलता पवार आणि नरेंद्र पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून तिन्ही सामाजिक उपक्रमांचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी भाजपा महिला मोर्चा प्रदेश सचिव प्रिया शर्मा, मनिषा केळकर, जिल्हा महिला मोर्चा सरचिटणीस प्रीती दीक्षित, जुने कल्याण मंडल सरचिटणीस विवेक वाणी, नवीन कल्याण मंडल महिला मोर्चा अध्यक्षा भावना मनराजा, उपाध्यक्ष विनोद मुथा, जुने कल्याण महिला मोर्चा सरचिटणीस अँड. अर्चना सबनीस, संध्या निकुंभ, सारिका शाह, जमशेद खान, समृद्धी देशपांडे, सुधीर जोशी, रवी गुप्ता, सदा कोकणे, प्रणव महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.

ज्यामध्ये उमादेवी सीताराम बैरागी हॉस्पिटल आणि फर्टिलीटी रिसर्च सेंटरच्या सहकार्याने स्त्री रोग तज्ञांकडून महिलांची मोफत तपासणी करण्यात आली. त्यानंतर अनिल आय हॉस्पिटलच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी, निकॅड कॉम्प्युटर अकादमीच्या माध्यमातून 100 महिलांसाठी 1 महिना मोफत संगणक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या नोंदणीचेही आयोजन करण्यात आले होते. इतकेच नाही तर सध्या रुग्णालयांना असणारा रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन भारतीय जनता पक्ष जुने कल्याण मंडळातर्फे भव्य रक्तदान शिबिराचेही याठिकाणी आयोजन केले होते. या सर्व सामाजिक उपक्रमांमध्ये कल्याण पश्चिमेतील शेकडो महिला, तरुणी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

तर वाढदिवसानिमित हेमलता नरेंद्र पवार यांचे अभिष्टचिंतन करण्यासाठी राजस्थान हॉलमध्ये भाजपच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केल्याचे दिसून आले.

# शेतकऱ्यांना भात विक्रीचे पैसे मिळावेत

## रयत शेतकरी संघटनेच्या वतीने मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद :** आदिवासी विकास महामंडळानी खरेदी केलेल्या भाताचे काही शेतकऱ्यांना अद्याप पैसे न मिळाल्याने सदरचे पैसे मिळावेत अशी मागणी रयत शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ अंतर्गत आधारभूत भात खरेदी हंगाम योजना सन 2024-25 अंतर्गत आधारभुत किंमत खरेदी योजना राबविण्यात आलेल्या



शहापूर, मुरबाड तालुक्यातील काही शेतकऱ्यांना अद्यापही भात विक्रीचे पैसे मिळालेले नाहीत यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक अडचण वाढत असून सध्या खरीप हंगाम लागवडीसाठी परिणाम होत आहे. त्यामुळे या महामंडळाने खरेदी केलेल्या भाताचे पैसे मिळावेत अशी मागणी रयत शेतकरी संघटनेचे ठाणे जिल्हा लोकसभा अध्यक्ष रामचंद्र (काळुराम) घोडविंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे शहापूर युवा तालुकाध्यक्ष सचिन विशे व पदाधिकारी यांनी उपप्रादेशिक कार्यालय, शहापूर येथे निवेदन देऊन केली आहे.

दरम्यान, येत्या सहा दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होतील असे आश्वासन येथील महामंडळ कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दिले असल्याचे सचिन विशे यांनी म्हटले आहे.

### शिवसेना तर्फे
# विद्यार्थांना मोफत वह्या वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे या उद्देशाने विद्यार्थ्याला मोफत शैक्षणिक साहित्य शिवसेना माध्यमातून प्रत्येक वर्षी दिले जाते. त्याचाच भाग म्हणून मानपाडा विभागातील विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आल्या. शिवसेना पदाधिकारी दत्ता वझे यांच्या आयोजनातून हा कार्यक्रम करण्यात आला. शालेय वह्या घेण्यासाठी विद्यार्थांनी गर्दी केली होती.

प्रत्येक विद्यार्थ्याला वह्या मिळाल्या पाहिजे यासाठी या वह्या वाटप कार्यक्रमात शाळेतील शिक्षकांनी मोठे सहकार्य केले. या कार्यक्रमाला गुलाब वझे, अर्जुन पाटील, दत्ता वझे , गजानन मांगरुळकर, अभिमन्यू म्हात्रे, रमेश पाटील, सागर म्हात्रे, भास्कर वझे, दत्ता म्हात्रे, अमित वझे, महादु भोईर दिलीप चव्हाण, आनता पाटील, ज्ञानेश्वर माळी , प्रकाश भोईर, बाळु भोईर, बबन पवार आदी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ती उपस्थित होते.

दरम्यान दत्ता वझे म्हणाले, शिवसेना पक्ष वीस टक्के राजकारण आणि ऐंशी समाजकारण म्हणून काम करीत असते. वर्षभर अशी कामे होत असतात. शिवसेना शाखेत आलेल्या सर्वांच्या अडीअडचणी ऐकून त्या सोडविण्याचा प्रयत्न करत असतो. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि आमदार राजेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागात काम होत असते. आमच्या विभागात झालेली विकासकामे येथील नागरिकांच्या भावली असून आजही लोक शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहेत. त्यामुळेच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत आमचा विजय झाला. आताही लोकाचा आशीर्वाद आम्हालाच मिळेल असा विश्वास आहे.

# ओबीसी विद्यार्थ्यांना विविध योजनांची माहिती ग्रामसभेत देणे आवश्यक- प्रा. सुवर्णा पगार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** महाज्योतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या शिष्यवृत्तीच्या योजना तसेच ओबीसी विद्यार्थ्यांना विविध योजनांची व शासकीय योजनांची माहिती ग्रामसभेत देणे अत्यंत आवश्यक आहे असे मार्गदर्शन नाशिक विभागीय कार्यालय प्रकल्प व्यवस्थापक प्राध्यापक सुवर्णा पगार यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी ओबीसी प्रवर्गामध्ये येणाऱ्या सर्व उपघटकांना महाज्योतीमार्फत सरकार कोणकोणत्या सोयी सवलती अथवा शिष्यवृत्ती देत आहे , त्यासाठी काय आणि कोणते निकष आहेत याबाबत सविस्तर माहिती दिली.या सभेला उपस्थित असलेल्या सदस्यांनी अनेक प्रकारचे प्रश्न विचारले असता एक बाब निदर्शनास आली की पालक वर्ग याबाबत अजूनही अनभिज्ञ आहे त्यामुळे पालक, समाज यांना या



विषयाची माहिती व्हावी यासाठी सर्व शासकीय शिष्यवृत्ती, सर्व शासकीय योजना विद्यार्थी हितासाठी असलेल्या संस्था आणि त्यांचे कार्य याबाबत आपण आपल्या प्रत्येक गावामध्ये होणाऱ्या ग्रामसभेत याची माहिती दिली तर प्रत्येक पालकांपर्यंत या विषयाची जाणीव जागृती होईल अशा प्रकारची आशा प्राध्यापक सुवर्णा पगार यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने राज्यस्तरीय ऑनलाइन सभेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक सुवर्णा पगार यांनी आपल्या ओबीसी बांधवांसाठी स्थापित केलेल्या महाज्योतीची इत्यंभूत माहिती दिली. त्यानंतर संघटनेच्या वतीने नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल अभिनंदन ठराव घेणेत आला. नॉन क्रिमीलेअर व पदोन्नतीच्याया प्रश्नांवर जाणीव जागृती व्हावी यासाठी आयोजन करण्यात येणार असल्याचे प्रदेश सरचिटणीस संतोष भोजने यांनी सांगितले. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले यांनी सुरेख असा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल लहू राक्षे यांनी संघटनेच्या वतीने आभार मानले व संघटनेच्या ध्येयधोरणे याबाबत चर्चा केली. ऍड.मंगेश ससाणे यांनी ही यथोचित मार्गदर्शन केले.. राजेंद्र खैरनार यांनी अभिनंदन ठराव मांडला व आणि उपस्थित सदस्यांनी हात उंचावून अनुमोदन दिले.सभेला राज्य विभाग तथा जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी आपल्या ओबीसी बांधवांना घेऊन उपस्थित होते.

# आढळा धरण आज भरले लाभक्षेत्रात आनंदाला उधाण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**अकोले :** तालुक्यातील देवठाण येथील 1060 दशलक्ष घनफूट क्षमतेचे आढळा धरण आज दुपारी 12 वाजता पूर्ण क्षमतेने भरले असल्याचे जलसंपदा विभागाने जाहीर केले आहे. यामुळे लाभक्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. सध्या 60 क्यूसकने नदीपात्रात विसर्ग सुरू आहे.

आढळा धरण हे 1060 दलघफू क्षमता आहे. हे धरण चालू वर्षी जुलै च्या पहिल्या आठवड्यात भरत असल्याने शेतकरी बांधव प्रचंड खुश आहेत. रब्बी पिक व पिण्याचे पाण्याची व्यवस्था झाली आहे. अकोले



तालुक्यातील देवठाण वीरगाव, हिवरगाव आंबरे, डोंगरगाव, पिंपळगाव निपाणी व गणोरे तसेच संगमनेर तालुक्यातील धांदरफळ, जवळेकडलग, पिंपळगाव कोंझिरा, वडगाव लांडगा, चिकणी, राजापूर, निमगाव भोजापूर व चिखली ही आठ गावे व सिन्नर तालुक्यातील चास, नळवाडी व कासारवाडी दोन गावे अशा या १६ गावांना शेतीसाठी याच आढळा धरणातून पाणी मिळते याशिवाय पाच गाव पाणीपुरवठा योजना असून या गावांना पिण्यासाठीही या धरणातून पाणी दिले जाते त्यामुळे आढळा धरण भरणे परिसराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे व गरजेचे आहे. लाटांनी सांडव्याच्या बाहेर पाणी पडत असल्याने शेतकरी वर्गात

**दरवर्षी भंडारदरा व निळवंडे धरण भरल्यानंतर आढळा धरण भरण्यासाठी मोठी प्रतीक्षा करावी लागत असे. परंतु यावर्षी आढळा धरण अगोदर भरत असल्याने परिसरात समाधानाचे वातावरण आहे.**

समाधानाचे वातावरण पसरले आहे. लवकरच शासकीय जलपूजनाचा कार्यक्रम होणार आहे. अशी माहिती अकोले उपविभागीय जल अभियंता योगेश जोर्वेकर यांनी दिली.

## रेसिपी
# आरोग्यदायी पालक



**पचन सुधारते**

पालकामध्ये फायबर आणि नैसर्गिक एंजाइम असतात जे पचन सुरळीत करण्यास मदत करतात.हे बद्धकोष्ठतेपासून मुक्त होऊ शकते आणि तुमची पचनसंस्था स्वच्छ ठेवू शकते.

**हिमोग्लोबिन वाढवते**

पालकामध्ये लोह आणि फोलेट भरपूर प्रमाणात असते, जे लाल रक्तपेशींच्या निर्मितीस मदत करते.हे हिमोग्लोबिनची पातळी सुधारण्यास मदत करते आणि अशक्तपणा किंवा कमी उर्जा असलेल्या लोकांसाठी उत्तम आहे.

**दृष्टीसाठी चांगले**

पालकामध्ये ल्युटीन आणि व्हिटॅमिन ए भरपूर प्रमाणात असते, जे डोळ्यांच्या आरोग्यासाठी आवश्यक असतात.कोरडे डोळे, रात्रीचा अंधत्व आणि दृष्टी कमी होणे टाळण्यास मदत करते.

**निरोगी त्वचा मिळते**

व्हिटॅमिन ए आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध, पालकाचा रस मुरुमे, मुरुमे आणि वृद्धत्वाची चिन्हे कमी करण्यास मदत करतो.तुमच्या त्वचेला नैसर्गिक चमक देते.

# आजचे राशि भविष्य



**मेष**
तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल.

**वृषभ**
काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल. ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, ज्या पूर्ण करण्यासाठी तुमच्या सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**मिथुन**
मुलांकडून आनंद मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाईल.तुम्ही तुमचे व्यावसायिक संपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न कराल.

**कर्क**
एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी किंवा राजकारणी व्यक्तीशी भेटणे फायदेशीर ठरेल. व्यवसायात आज तुम्हाला फायदा होईल.आजचा दिवस उत्तम असेल.

**सिंह**
व्यवसायात नफा मिळविण्यासाठी तुम्हाला कोणाची तरी मदत घ्यावी लागेल. तसेच, आज तुम्हाला वादविवादांपासून दूर राहावे लागेल .

**कन्या**
तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकाल.तुमची वैयक्तिक समस्या सुटल्यानंतर तुम्हाला मानसिक शांती मिळेल. कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल.

**तूळ**
तुम्हाला काही कामात मदत लागेल, या बाबतीत तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल. महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील.

**वृश्चिक**
व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील. विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील.

**धनु**
या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते. आज तुमचे कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल.

**मकर**
तुम्ही काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, यामुळे काम वेळेवर आणि सहजतेने पूर्ण होण्यास मदत होईल.

**कुंभ**
विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. तुमच्या कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**मीन**
विद्यार्थ्यांना स्पर्धेशी संबंधित कार्यात यश मिळू शकते. नवीन कामाचा विचार करण्याची पूर्ण संधी मिळू शकते. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# अंबरनाथ नगरपालिकेच्या शाळेची दुरावस्था

## अस्वच्छता अन घाणीतच विद्यार्थ्यांना शिक्षण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ, ता. 3 (बातमीदार)** अंबरनाथ नगरपालिकेची शाळा क्रमांक एक नुकतीच अत्याधुनिक आणि सुसज्ज बांधण्यात आली आहे. दुसरीकडे मात्र शिवमंदिर परिसरातील शाळा क्रमांक नऊमधील विद्यार्थ्यांना चिखलातून जाण्याची आणि पावसाच्या पाण्यात अभ्यास करायची वेळ आली आहे. या शाळेच्या इमारतीची प्रचंड दुरवस्था झाली आहे. छतातून पावसाचे पाणी झिरपत असल्याने भिंती ओल्या झाल्या आहेत. सर्वत्र अस्वच्छता असून अशा घाणीतच विद्यार्थ्यांना बसवून शिकवले जात आहे.

याशिवाय, काही दिवसांपूर्वीच शाळेत चोरीची घटनाही घडली होती. अंबरनाथच्या शिवमंदिर परिसरात नगरपालिकेची नऊ नंबरची शाळा सुरू आहे. शाळेत पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण दिले जाते. शाळेची पटसंख्या १७५ असून बालवर्गात २८ विद्यार्थी शिक्षणाचे धडे गिरवतात.

नगरपालिका कालावधीपासून फार जुन्या जागेत शाळा सुरू आहे. सद्यस्थितीत शिवमंदिर परिसराचे सुशोभीकरणाचे काम सुरू असल्याने मातीचे ढिगारे शाळेसमोर पसरले आहे. या मातीमुळे पावसात चिखल निर्माण झाला आहे. याच चिखलातून वाट काढत विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मार्ग काढावा लागतो. याशिवाय, शाळेच्या इमारतीची प्रचंड दुरवस्था झाली आहे. पावसाचे पाणी झिरपत असल्याने सर्व वर्गातील भिंतींना ओलावा आला आहे. त्यात पावसाचे पाणी बाहेरून शाळेत वाहताना दिसून येत आहे. वर्गातूनच पाण्याला वाट काढून दिल्याचे पाहावयाला मिळते.

शाळेमध्ये मागील महिन्यात चोरीचा प्रकारही घडला. चोरट्यांनी लोखंडी खुर्चा, सीसी टीव्ही कॅमेरा, संगणकाच्या आवश्यक वस्तू, याशिवाय अंगणवाडीतील मुलांना बसण्यासाठी आणलेल्या चटयाही पळवून नेल्या आहेत. एका खासगी संस्थेने शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी संगणक यंत्रणा उपलब्ध करून दिली होती. त्याचा काही भाग पळवण्यात आला आहे. याबाबत शाळेच्या वतीने शिवाजीनगर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. शाळेतील मुलींच्या स्वच्छतागृहाचे दरवाजे चोरीला गेले असून, ते बसवून मिळावेत, अशी मागणी मुख्याध्यापक श्रीराम जोशी यांनी पालिका प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

> **शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम शिवगंगानगर परिसरात सुरु आहे. त्यामुळे येत्या काही महिन्यांत शाळा नव्या इमारतीमध्ये सुरु होणार आहे. शाळेची पाहणी करण्यात आली असून शाळेत भेडसावणाऱ्या समस्या त्वरित दूर करण्यात येईल. तसेच, शिक्षक, विद्यार्थ्यांना होणारा त्रास कमी करण्याच्या दृष्टीने मार्ग काढण्यात येईल.**
>
> - जयश्री धायगुडे, नगरपालिका शिक्षण विभाग प्रशासनाधिकारी, अंबरनाथ

# ठाणे तहसीलदार कार्यालयाचे स्थलांतर

## जनतेसह लाभार्थ्यांना करावी लागणार पायपीट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २ :** मुख्य बाजारपेठेत असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागासह तहसीलदार कार्यालय यांचा एकत्रित पुनर्विकास करण्यात येत आहे. त्यामुळे हे दोन्ही कार्यालयांचे स्थलांतर ज्युपिटर हॉस्पिटलशेजारी असलेल्या पार्किंग प्लाझा येथे करणार आहे. त्यानुसार तहसीलदार कार्यालयही स्थलांतरणाच्या हालचाली सुरु झाल्या आहेत.

मात्र, तहसील कार्यालयामार्फत नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येतो. यामध्ये विद्यार्थ्यांसह वयोवृद्ध व अपंगाचा समावेश आहे. त्यामुळे आता या योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना पायपीट करावी लागणार आहे. ठाणे रेल्वे स्थानकापासून अवघ्या हाकेच्या अंतरावर तहसीलदार कार्यालय व सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. या दोन्ही कार्यालयांच्या इमारती या जुन्या व जीर्ण झाल्या असल्यामुळे त्यांचा एकत्रित पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम व तहसील कार्यालयाचे स्थलांतर करणे गरजेचे आहे. त्यानुसार ठाणे पालिकेने या कार्यालयाच्या तात्पुरत्या स्थलांतरणासाठी ज्युपिटर रुग्णालयाशेजारील पार्किंग प्लाझा येथे जागा दिली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्थलांतरण झाले असून आता तहसील कार्यालयही करणार आहे.

या कार्यालयामार्फत विधवा महिलांसाठीची योजना, श्रावणबाळ योजना, सेतू मार्फत अधिवास दाखला, उत्पन्नाचा दाखला यांसह शासनाच्या विविध योजनांच्या लाभ व दाखले देण्यात येत असतात. यासाठी आता त्यांना थेट माजिवडा पार्किंग प्लाझा गाठावे लागणार आहे. त्यामुळे वृद्धांसह विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागणार आहे.

# पनवेल मनपाच्या प्रारुप विकास आराखड्यातील साडेतीन हजारांहून अधिक हरकतींवर सुनावणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल :** पनवेल महापालिकेने गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात जाहीर केलेल्या पहिल्या प्रारुप विकास आराखड्यातील साडेसहा हजारांहून अधिक हरकती आणि सूचना समितीसमोर आल्या. यामध्ये साधर्म्य हरकतींची संख्या निम्याहून अधिक होती. समितीने साडेतीन हजारांहून अधिक हरकतींवर सुनावणी घेतली. या सुनावणीनंतर १५९ हरकतींवर फेरबदल करण्याचे समितीने सूचना राज्याच्या नगरविकास विभागाकडे केली.

या प्रारुप विकास आराखडयावर सिडको मंडळाच्या वतीने सुचविण्यात आलेल्या सुधारणांचा सर्वाधिक विचार करण्यात आला. कासाडी आणि गाढी या महापालिका क्षेत्रातील मुख्य दोन नद्यांच्या पूर नियंत्रण रेषेला बाधा न होता तसेच तळोजा औद्योगिक वसाहतीलगतच्या गावांमधील २३ मीटर लांबीचा बफर झोन राखूनच विकास आराखडा अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात आल्याचे महापालिकेच्या नियोजन व नगररचना विभागाकडून सांगण्यात येत आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या तुलनेत पनवेल महापालिकेने प्रारुप विकास आराखडा बनवून त्यावर हरकती व सूचनांचा फेरबदल करण्याच्या कामात गती मिळवली. पुढील काही दिवसांत राज्य सरकारकडे पनवेल महापालिकेचा प्रारुप विकास आराखडा अंतिम करण्यासाठी पाठविण्यात येणार आहे.

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

शंकरराव चौक, कल्याण (प), जि. ठाणे- ४२१३०१,
संकेत स्थळ www.kdmc.gov.in दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

**-: जाहीर सूचना :-**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची सेक्टर क्र. १ ची विकास योजना शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस/१२९९/१९१०/सी.आर.३४/२०००/नवि-१२ दिनांक ०३/०९/२००५ व क्र. टिपीएस /१२०७/६०४/सी.आर.४९४/०८/नवि-१२ दिनांक १४/०९/२००९ तसेच सेक्टर क. ४ ची विकास योजना शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस/१२०८/२८८४/सी.आर.१३९/०९/नवि-१२ दिनांक:-०४/०४/२०१२ व क्र. टिपीएस/१२१२/४५८/सी.आर.१४८/१२/नवि-१२, दिनांक:-०४/०८/२०१६ अन्वये मंजूर झालेली आहे.

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रस्तावीत केलेला उन्नत मार्गाच्या आखणी प्रमाणे कल्याण पूर्व विभागातील विठ्ठलवाडी स्मशानभूमी ते जगदीश दुग्धालय ते रोशन पेट्रोल पंप (मुरबाड रोड) पर्यंत उन्नत मार्ग विकसीत करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रस्तावीत केलेल्या उन्नत मार्गाच्या आखणी अनुषंगाने विकास योजनेतील २४.०० मी. रुंद रस्त्याच्या रूपरेषेत होणाऱ्या फेरबदलास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २६/०६/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील सेक्टर क्र. १ व ४ मधील विकास योजनेतील २४.०० मी. रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० मधील तरतुदीनुसार रस्ता रेषा विहित करण्याची कार्यवाही करण्यासाठी सर्व्हेक्षण नकाशात दर्शविल्याप्रमाणे A, B, C, D, E, F, G, H याप्रमाणे २४.०० मी. रुंद करण्याचा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा मानस आहे.

त्याअर्थी, सदरहू रस्त्यालगत परिसरातील तसेच कल्याण पूर्व विभागातील पुना लिंक रोड ते कल्याण पश्चिम विभागातील मुरबाड रोड यांना जोडणारा महत्वाचा रस्ता सर्वसाधारणपणे लांबी १५००.०० मी. इतकी असून तेथील नागरीकांना रहदारीच्या व वाहतुकीच्या दृष्टीने सोईस्कर होईल.

त्याअर्थी, या जाहिर सूचनेद्वारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये मधील तरतूदीनुसार सदर परिसरातील तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरीकांना या जाहिर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, उक्त रस्ता २४.०० मी. रुंद करून रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या रेषा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या नगर रचना विभागामार्फत सर्व्हेक्षण केलेल्या नकाशाप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० प्रमाणे कोणीही वरीलप्रमाणे विहित केलेल्या रस्त्याच्या रूपरेषेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू शकणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

१) नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या मुदतीत नागरीकांनी आपल्या सुचना / हरकती असल्यास मा.प्रशासक तथा आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका द्वारा महापालिका सचिव, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांच्याकडे लेखी स्वरूपात द्याव्यात.
२) सदर नोटीस व नकाशाची प्रत नागरीकांच्या माहितीसाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका नगररचना विभागाच्या नोटीस बोर्डावर तसेच 'जे' प्रभाग कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

जावक क्रमांक :
कडोंमपा/जसवि/मुका/२६४
दिनांक : ०३ जुलै २०२५

सही/-
सहाय्यक संचालक नगररचना
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

# वसई आरटीओ समोर जप्त वाहनांच्या ढिगाऱ्याचे आव्हान !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** पालघर जिल्ह्याच्या प्रादेशिक परिवहन विभागाने विविध प्रकारच्या कारवाया मध्ये वाहने जप्त केली आहेत. मात्र ही वाहने सोडविण्यासाठी मालक पुढे येत नसल्याने अशी वाहने कार्यालयाच्या आवारातच पडून आहेत. त्यामुळे जप्त वाहनांचा ढीग तयार झाला असल्याचे चित्र दिसून येत आहे. वसई प्रादेशिक विभागाकडून नियमबाह्य पद्धतीने वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर अधूनमधून कारवाई केली जाते. तर काही कारवायांमध्ये वाहने उचलली जातात. यात ट्रक, रिक्षा, बस व इतर वाहनांचा समावेश आहे. यातील काही वाहनचालक हे वाहने घेऊन जाण्यास परत येत नाहीत. त्यामुळे ही वाहने प्रादेशिक परिवहन विभागाच्या कार्यालयाच्या समोर पडून आहेत. यातील काही वाहने गंजून भंगार झाली आहेत.

दिवसेंदिवस परिवहन विभागाच्या कार्यालयाच्या आवारात अशा प्रकारच्या वाहनांचा ढीग वाढू लागला आहे. या वाहनांमुळे जागाही मोठ्या प्रमाणात अडवली जात आहे. तर दुसरीकडे या ठिकाणी ठेवण्यात आलेल्या वाहनांचे साहित्य ही चोरीला जात असल्याचे प्रकार घडत आहेत. अशी जप्त केलेल्या या वाहनांचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी आता परिवहन विभागाने कारवाईत उचलेल्या वाहनांचा लिलाव करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठीची प्रक्रिया ही परिवहन विभागाने सुरू केली असल्याचे परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. पहिल्या टप्प्यात साधारणपणे ५० पेक्षा अधिक वाहनांचा लिलाव करण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचे परिवहन विभागाने सांगितले आहे.

# बेकायदा बांधकामांविरोधात उल्हासनगर मनपा पुन्हा आक्रमक


## स्काय डोम हॉलच्या टेरेसवरील बांधकामावर कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. 3 (वार्ताहर)** उल्हासनगर महापालिकेने पुन्हा एकदा बेकायदा बांधकामांविरोधात कडक भूमिका घेतली आहे. शांतीनगर परिसरातील स्काय डोम हॉलच्या टेरेसवरील तब्बल तीन हजार चौरस मीटर वाढीव अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे हे बांधकाम नोटीस, न्यायालयीन प्रक्रिया आणि संधी देऊनही नियमित न झाल्याने महापालिकेला धडक कारवाईचा निर्णय घ्यावा लागला.

> **स्काय डोम हॉलवरील तब्बल तीन हजार चौरस मीटरच्या अनधिकृत बांधकामाबाबत महापालिकेने वारंवार नोटिसा पाठवल्या होत्या. पण त्या नोटिसा दुर्लक्षित करण्यात आल्या. त्यामुळे आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या आदेशानुसार पोलिस बंदोबस्तात कडक कारवाई केली. ही कारवाई इतर अनधिकृत बांधकामधारकांसाठी इशारा आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करावे. कायदेशीर मार्गानेच विकास करावा.**
>
> ■ गणेश शिंपी, सहाय्यक आयुक्त, उल्हासनगर महापालिका

उल्हासनगर कॅम्प ३मधील शांतीनगर परिसरात स्थित रिजेन्सी वाणिज्य संकुलातील स्काय डोम नावाच्या हॉलच्या टेरेसवर मोठ्या प्रमाणात म्हणजेच तब्बल तीन हजार चौरस मीटर क्षेत्रफळावर अनधिकृत वाढीव बांधकाम करण्यात आले होते. या हॉलच्या माध्यमातून भाडे वसूल करून व्यवसाय सुरू होता; मात्र हे बांधकाम नियमबाह्य असल्याची माहिती प्रहार जनशक्ती पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष अॅड. स्वप्नील पाटील यांनी महापालिकेला दिल्यानंतर याप्रकरणी हालचाल सुरू झाली.



उल्हासनगर महापालिकेच्या नगररचनाकार विभागाने या ठिकाणी पाहणी केली. बांधकाम बेकायदा असल्याचे निष्पन्न केल्यानंतर हॉलच्या मालकाला नोटीस बजावली होती. त्यानंतरही बांधकाम नियमित करण्यासाठी दिलेल्या संधीचा फायदा घेतला नाही. अखेर आयुक्त मनीषा आव्हाळे आणि अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त गणेश शिंपी यांच्या नेतृत्वाखाली पोलिस बंदोबस्तात हे बांधकाम पाडण्याची कारवाई सुरू केली. या कारवाईसाठी दोन दिवसांचा कालावधी लागणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त गणेश शिंपी यांनी दिली.

# मराठीचा मुद्दा : मीरा भाईंदरमध्ये व्यापाऱ्यांचा मनसे विरोधात मोर्चा

**मीरा-भाईंदर:** मराठीच्या मुद्यावरून एका परप्रांतीय दुकानदार आणि फेरीवाल्याला मारहाण केल्यानंतर मनसेविरोधात मीरा-भाईंदरमध्ये व्यापाऱ्यांनी आज मनसे विरोधात मोर्चा काढला. व्यापाऱ्याला मारहाण झाल्यानंतर मनसेविरोधात अमराठी व्यावसायिकांमध्ये संतापाची लाट उसळली. सुरक्षेच्या मुद्यावर आज मीरा-भाईंदरमध्ये व्यापाऱ्यांनी बंद पुकारत मोर्चा काढला. यावेळी स्थानिक व्यापाऱ्यांनी शक्ती प्रदर्शन केले. मीरा रोड येथील शांती पार्क परिसरात असलेल्या जोधपूर स्वीट्स अँड नमकीन या दुकानाच्या मालकाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांकडून मारहाण करण्यात आली. या मारहाणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. या घटनेचे पडसाद उमटू लागले आहेत. मीरा-भाईंदर शहरातील व्यावसायिक आणि व्यापाऱ्यांकडून आज मारहाणीच्या निषेधार्थ दुकाने बंद ठेवण्यात आली आहेत.

मारहाण झालेल्या व्यावसायिकासोबत जे घडले, ते भविष्यात इतर कोणासोबतही घडू शकते, या चिंतेतून व्यापाऱ्यांनी जोरदार मोर्चा काढला. सेवेन स्कूल, मिरा रोड (पूर्व) येथून पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्या कार्यालयापर्यंत एक भव्य निषेध रॅली काढण्यात आली. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करत व्यापाऱ्यांनी पोलीस प्रशासनाकडे आपले एक निवेदन दिले आहे.




# पालघर जिल्ह्यातील सात ग्रामपंचायतींना विभाजनाची प्रतीक्षा !

## मुदत कालबाह्य झाल्याने नव्याने ठराव घेण्याची नामुष्की

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डहाणू :** पालघर जिल्ह्यातील डहाणू, पालघर आणि विक्रमगड या तीन तालुक्यातील सात ग्रुप ग्रामपंचायतींच्या विभाजन प्रलंबित असून यातील दोन ग्रुपग्रामपंचायतींचे ठराव शासन स्तरावर पाठवण्यात आले आहेत. यातील काही ग्रामपंचायतींनी याआधी प्रस्ताव सादर केले होते. मात्र मुदत कालबाह्य झाल्यामुळे पुन्हा नव्याने ग्रामसभेचा ठराव घेऊन प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पालघर मधील डहाणू तालुक्यातील वरोर, कैनाड, धरमपुर, वणई, विक्रमगड मधील खुडे, डोल्हारी खुर्द आणि पालघर मधील मायखोप या सात ग्रुपग्रामपंचायतींनी विभाजनासाठी प्रस्ताव सादर केले होते. मात्र हे प्रस्ताव कालबाह्य झाल्याचे ग्रंपंचायातींना नव्याने प्रस्ताव सादर करण्याची सूचना देण्यात आली आहे. यातील वरोर आणि धरमपूर ग्रामपंचायतींनी नव्याने प्रस्ताव सादर केले असून हे प्रस्ताव पुढील कारवाई साठी वरिष्ठ स्तरावर पाठवण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

ग्रुपग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये अंतर जास्त असल्यास काम करण्यासाठी अडचणी निर्माण होत असून ग्रामसेवक आणि ग्रामपंचायत सदस्यांना धावपळ कारवाई लागत आहे. तसेच ग्रामपंचायत हद्दीतील लोकसंख्या वाढल्यामुळे अडचणी निर्माण होत असून विकास कामांसाठी निधी अपुरा पडत असल्यामुळे ग्रामपंचायतींचे विभाजन करण्याची गरज निर्माण होत आहे. यासाठी ग्रामपंचायतींचे विभाजन करण्याची गरज असून ग्रामपंचायतींनी ग्रामसभेचे ठराव घेऊन पंचायत समिती मध्ये प्रस्ताव सादर करण्याची गरज अधोरेखीत होत आहे. ग्रुप ग्रामपंचायत विभाजन करून विभक्त ग्रामपंचायत निर्माण करण्यासाठी शासनाने ठरवून दिलेले निकषाप्रमाणे कारवाई करणे आवश्यक आहे.

निवडणुकीच्या काळात ग्रामपंचायत विभाजन करणे शक्य नसून निवडणुकीनंतर दोन वर्षांनी विभाजनाचे प्रस्ताव सादर करता येतात. सध्या अनेक ग्रामपंचायतींच्या निवडणुका होऊन दोन वर्ष पूर्ण झाले असून ग्रुप ग्रामपंचायतींनी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# महामंडळ वाटपाची आकडेमोड सुरू



## पदांवरुन आपसांत नाराजी नको !

**यातील काही महामंडळे अतिशय महत्त्वाची मानली जातात. त्यांचे वाटप हाही कळीचा मुद्दा आहे. युतीच्या समन्वयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे आशिष कुलकर्णी यांची या नेमणुका पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयात विशेष कार्यअधिकारी म्हणून नुकतीच नेमणूक करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, पदवाटपातून नाराजी निर्माण होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक मानले जात आहे. तथापि, त्यामुळे या नेमणुका टळू नयेत, असे तिन्ही पक्षांनी समन्वय बैठकीत मान्य केले आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सत्तेची ऊब कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचावी, असा आग्रह समन्वय समितीच्या बैठकीत धरल्यामुळे शासकीय महामंडळ वाटपाची आकडेमोड सुरू झाली आहे.

भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात आमदारांच्या संख्येनुसार महामंडळांचे वाटप होण्याचा प्रस्ताव समोर करण्यात आला आहे. राज्यात एकूण 110 महामंडळे आहेत. यातील प्रत्येक महामंडळावर किमान 5 सदस्य नेमण्याचा निर्णय घेतला, तरी सुमारे 550 कार्यकर्त्यांना काम करण्याची संधी मिळेल, असे भाजपचे म्हणणे आहे. सत्ता स्थापनेत भाजप संघटनेने दिलेले योगदान लक्षात घेता या मंडळींना संधी दिली पाहिजे, असे प्रदेशाध्यक्षांचे मत आहे.

> **शासकीय महामंडळावर कार्यकर्त्यांना संधी मिळावी**
> **- प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण**

आम्ही किती दिवस सतरंज्या उचलायच्या, ही भाजपच्या मंडळींची खंत दूर करायला हवी, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केल्याचे कळते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनासुद्धा हा प्रस्ताव मान्य आहे. भाजपने सुमारे 50 महामंडळे स्वतःकडे ठेवून महायुतीतील दोन्ही सहकारी पक्षांना उर्वरित महामंडळे देण्याचा प्रस्ताव आहे. त्यावर या दोन्ही पक्षांचे एकमत झालेले नाही.

# आसनगाव : भारंगी नदीत तरुण बुडला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** आसनगाव येथील रेल्वे पुलाखालून वाहणाऱ्या भारंगी नदीत तरुण बुडल्याची घटना बुधवारी दुपारी उघडकीस आली. सार्थक कोळी (१७) असे नदीत बुडालेल्या तरुणाचे नाव असून तो कल्याण येथे वास्तव्यास आहे. डिप्लोमाच्या दुसऱ्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेण्यासाठी तो आसनगाव येथील जोंधळे महाविद्यालयात त्याच्या मित्रांसोबत आला होता. जीवरक्षक दल, स्थानिक ग्रामस्थ आणि पोलिसांच्या माध्यमातून त्याचा शोध सुरू असल्याचे शहापूर पोलिसांनी सांगितले. डिप्लोमाच्या दुसऱ्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेण्यासाठी कल्याण येथून सार्थक त्याच्या मित्रांसोबत आसनगाव येथील जोंधळे महाविद्यालयात आला होता. प्रवेश प्रक्रियेसाठी अवधी असल्याने आसनगाव येथील रेल्वे पुलाखाली भारंगी नदी जवळ सार्थक मित्रांसोबत फिरायला गेला. त्यांनी नदीत पोहण्याचा निर्णय घेतला. पावसाचा जोर असल्याने भारंगी नदी तुडुंब भरून वाहत होती. या दरम्यान सार्थकला पाण्याचा अंदाज आला नसल्याने तो पाण्यात बुडाला.

# केडीएमसीतर्फे सुरक्षा प्रशिक्षण कार्यशाळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** सिवर - सेप्टिक टँक सफाईचे काम करताना अनेकदा अपघाताच्या घटना घडण्याचा संभव असतो. या दुर्घटनांना आळा घालण्यासाठी तसेच कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार आणि महापालिका प्रशासनातर्फे नमस्ते योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचाच एक भाग म्हणून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांसाठी आज कामा फाऊंडेशनतर्फे सुरक्षा प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून केंद्र, राज्य आणि महापालिका प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने सफाई कर्मचाऱ्यांचे प्रबोधन केले जात आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृहात आज संपन्न झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या या सुरक्षा प्रशिक्षण कार्यशाळेत सिवर - सेप्टिक टँक सफाई करताना कर्मचाऱ्यांनी कशाप्रकारे सुरक्षेची काळजी घ्यावी, कोणती उपकरणे वापरावीत, स्वतःच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी इ. प्रमुख मुद्द्यांवर कामा फाऊंडेशनच्या तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन करण्यात आल्याची माहिती महापालिकेच्या जनि / मनि: विभागाचे कार्यकारी अभियंता घन:श्याम नवांगुळ यांनी दिली आहे.

तसेच या कार्यशाळेला उपस्थित सफाई कर्मचाऱ्यांची नोंदणी करून त्यांना लागू असणारे शासकीय लाभ उपलब्ध करून देण्यासाठीही कार्यवाही केली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत सफाई मित्र व सफाई कामगारांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन देखील करण्यात आले होते त्याचा लाभ उपस्थित सफाई कामगारांनी घेतला.

# मोंहडुळ ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बळीराम केशव



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :** भिवंडी तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या मोंहडुळ गृप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बळीराम केशव यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

मावळत्या उपसरपंच जया पारधी यांनी आंपसात ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्याने हे पद रिक्त होते. त्यानुसार सरपंच महेश शाम आगीवले यांच्या अध्यक्षतेखाली एक खास सभा ग्रामपंचायत कार्यालयात बुधवारी घेण्यात आली यावेळी शिवसेना (उबाठा) गटाचे बळीराम लहु केशव यांचा उपसरपंच पदासाठी एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंच पदावर बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले.यावेळी ११ ग्रामपंचायत सदस्यांपैकी जया पारधी, शारदा आगीवले, राजेन भला, दिनेश कातवारे, आशा भोईर, रूची जाधव, उज्वला जाधव, हे सदस्य उपस्थित होते. शिवसेना उबाठा गटाचे बळीराम केशव यांची उपसरपंचपदी निवड होताच शिवसेना (उबाठा) भिवंडी ग्रामीण विधानसभा प्रमुख व माजी जिल्हा परिषद सदस्य महादेव घाटाळ यांनी व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, नागरीकांनी त्यांचे अभिनंदन केले. तर निवडणूक दरम्यान सचीव म्हणुन ग्रामपंचायत अधीकारी डी. डी. राठोड यांनी काम पाहिले.

# एकीकडे अधिकृत शाळा बंदचा इशारा तर दुसरीकडे अनधिकृत शाळांचा मेळावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




**दिवा :** महापालिकेच्या भोंगळ कारभाराने दिव्यात शिक्षणाचा गोंधळ घातला आहे. महापालिकेने स्वतःच्या शाळा लोकसंख्येच्या प्रमाणात वाढवल्या असत्या तर इथे शैक्षणिक असुविधांचा सामना नागरिकांना करावा लागला नसता ही वस्तुस्थिती आहे. दिव्यात एकीकडे अधिकृत शाळांनी अनधिकृत शाळा बंद व्हाव्यात यासाठी 1 जुलै पासून बेमुदत बंद पुकारला आहे. तर दुसरीकडे दिव्यात मान्यता नसलेल्या अनधिकृत शाळांचा मेळावा पार पडला आहे. शिक्षणाचा असा खेळखंडोबा अन्य कोणत्या शहरात सुरू नसेल. दिवा शहरातील ही शैक्षणिक स्थिती चिंतेची आहे.

अनधिकृत शाळा बंद होत नाहीत म्हणून अधिकृत शाळांनी बंद पुकारून स्वतःच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याचा विचार करावा याला काय म्हणावे. कदाचित हे राज्यातील पहिले उदाहरण असावे.

अनधिकृत शाळांचा विरोध करताना आपल्या शाळा बंद ठेवणे यातून साध्य ते काय होणार? खरं तर अधिकृत शाळांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. शाळा बंद ठेऊन आपल्या विद्यार्थ्यांचे हित कसं साधणार हा प्रश्न आहे.

दुसरीकडे अनधिकृत शाळांनी त्यांच्या शासकीय परवानग्या न घेता दिव्यातच मेळावे आयोजित केले तर हा शिक्षणाचा धोरणात्मक प्रश्न सुटणार आहे का ? हा ही आमचा प्रश्न आहे. अनधिकृत शाळांना परवानग्या का नाकारल्या जातात याचा शोध त्या त्या संस्था चालकांनी घ्यायला हवा. तुम्हाला शाळा सुरू करण्यासंदर्भातील शासनाच्या सर्व परवानग्या मिळाल्या नव्हत्या तर अशा अनधिकृत शाळा सुरू करून पालक विद्यार्थ्यांची अडचण का केली हाही महत्वाचा प्रश्न आहे.


ज्या अधिकृत शाळा दिव्यात आहेत त्यांना परवानग्या कशाच्या आधारे मिळाल्या याची माहिती शिक्षण विभागाने सार्वजनिक केली तर अनधिकृत शाळांना परवानगी घेण्यासाठी काय करावे लागेल याची कल्पना येईल. यातून प्रश्न सुटण्याच्या दिशेने वाटचाल होईल. पण दिव्यातील समस्यांवर वेळीच उपाययोजना करायच्याच नाहीत हा जणू निर्धारच ठाण्यात बसणाऱ्या अधिकाऱ्यांनी केलेला दिसतो.

**महापालिका प्रशासन जबाबदार**

महापालिका प्रशासनाने अद्याप अनधिकृत शाळांवर कारवाई का नाही केली हा संशोधनाचा विषय आहे. केवळ नोटीस आणि फलक लावून महापालिकेला जबाबदारी झटकता येईल का? स्वतः दिवा शहरात शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून द्यायच्या नाहीत आणि दुसरीकडे अनधिकृत शाळांवर कारवाई सुद्धा करायची नाही... या शाळांना परवानगी देखील द्यायची नाही हे धोरण कस चालेल? मुळात शिक्षण व्यवस्थेची जाण नसणारे लोकं या सिस्टीम मध्ये बसले की असे प्रश्न निर्माण होतात.

दिव्यात निर्माण झालेली शैक्षणिक अनागोंदी महापालिका शिक्षण विभागाचे पाप आहे. दरवर्षी शहरात अनधिकृत शाळा वाढत असतानाही त्याकडे डोळेझाक करणारे अधिकारी महापालिका शिक्षण विभागाचा शैक्षणिक दर्जा काय राखणार हा आमचा प्रश्न आहे. दिव्यात 60 हुन अधिक अनधिकृत शाळा आहेत. त्यात हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इतक्या संख्येने असणाऱ्या विद्यार्थ्यांना अन्य शाळांमध्ये सामावून घेणे तांत्रिक दृष्टीने शक्य नाही. खासगी अधिकृत शाळांची फी सामान्य कुटुंबातील विध्यार्थ्यांना परवडत नाही. महापालिका प्रशासनाने दिव्यात शाळांची संख्याही वाढवलेली नाही. अशा स्थितीत येथील विद्यार्थ्यांना न्याय कसा मिळणार हाही प्रश्न आहे. पालिका आयुक्तांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन दिव्यातील शैक्षणिक गोंधळ थांबवायला हवा!

प.पू.स. रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर(तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे



आयुष्यात अत्यंत यशस्वी व मोठ्या असणाऱ्या प्रत्येक व्यक्ती त्यांच्या गुरूच्या मार्गदर्शनाखाली, त्यांनी दाखवलेल्या वाटेवरून, पुढे जात मोठ्या होतात. अगदी एकलव्याचेच उदाहरण घ्या. गुरुने त्याला नाकारले तरी त्याने सरावाच्या वेळी आपल्या गुरुंचा पुतळा उभा करून धनुर्विद्येचा अभ्यास केला. या मागचा भावार्थ असा, आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अथक परिश्रम तर हवेच पण त्याला श्रद्धेची, विश्वासाची जोडही हवी. हा विश्वास, श्रद्धा आपल्याला गुरुत दिसते. त्याच्याकडून आपल्याला प्रेरणा मिळते. ही प्रेरणा देणारी व्यक्ती आपला गुरुच आहे.

गुरूमाऊली - प.पू.स. अलोकनाथजी महाराज

# केडीएमसीच्या डोंबिवली विभागीय कार्यालयात मंगळवारी जनता दरबार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील नागरिकांच्या तक्रारी समजुन घेणे आणि त्यांचे जलदगतीने निराकरण करण्यासाठी दर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी कल्याण मधील महापालिका मुख्यालयात दुपारी ३ ते ५ या वेळेत आयुक्तांच्या दालनात अभ्यागतांसाठी जनता दरबार आयोजित करण्यात येतो. तथापि जुलै मध्ये हा जनता दरबार, मंगळवार दि. ८ जुलै रोजी दुपारी ३ वाजता फ प्रभाग कार्यालय, पी.पी.चेंबर इमारत, पहिला मजला, शहीद भगत सिंह रोड, डोंबिवली (पूर्व) येथे आयोजित करण्यात आला आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.

# रायगडच्या खेळाडूंची किकबॉक्सिंग स्पर्धेमध्ये नेत्रदीपक कामगिरी





## (५ सुवर्ण ११ रौप्य १५ कांस्यपदक)

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** २६ ते २९ जून २०२५ रोजी पुणे येथे राज्यस्तरीय किकबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र (वाको इंडिया महाराष्ट्र) यांच्या द्वारे करण्यात आले होते. सदर स्पर्धा वाको इंडिया किकबॉक्सिंग फेडरेशन, मिनिस्ट्री ऑफ युथ अफेअर एन्ड स्पोर्ट्स, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, वर्ल्ड असोसिएशन ऑफ किकबॉक्सिंग ऑर्गनायझेशन आणि इंटरनॅशनल ऑलिम्पिक कौन्सिल यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये पनवेल शहर किकबॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने एकूण ४७ खेळाडू सहभागी झाले होते त्यापैकी५ सुवर्णपदक११ रौप्यपदक१५ कांस्यपदक मिळवत सुयश संपादित केले.

सुवर्णपदक विजेत्यामध्ये अन्वी निकम , ईशान कुंभार -किक लाईट इव्हेंट), नक्ष वेणकर , सुयश पवार, चिराग शिवगण, तर रौप्यपदक विजेत्या मध्ये पार्थवी भांड, पार्थ निकम, अनिकेत दुशिंग, प्रणव लब्दे, लावण्या जहा, शुभम जाधव, ईशान कुंभार, चैतन्य करमकर, वरद केणी , अन्वी निकम , ईशान कुंभार - लाईट कॉन्टॅक्ट इव्हेंट) तसेच कांस्यपदक विजेत्या मध्ये वर्धन कदम, विहान आंबोलकर, मनोज भंडारी, गायत्री केणी, सोहम सावंत, प्रज्वल दरेकर, सार्थक भगत, निहारिका देशमुख, सम्यक कांबळे, प्रणव लबाडे, पार्थ निकम (किक लाईट इव्हेंट),पार्थवी भांड(किक लाईट इव्हेंट), रवीना म्हात्रे (पॉईंट फाईट,लाईट कॉन्टॅक्ट) दिव्यांका सुतार सहभागातून स्मित म्हात्रे,स्वप्निल राठोड, ऑस्टिन थॉमस, प्रणभ कांबळे, अथर्व मधाने, नुकुंज पिंगळे, प्रिन्स पाटील, फिरोज अन्सारी, स्वामिनी शिर्के, भूमी गवळी, पूर्वा गायकवाड , दिया भगत या खेळाडूंना पनवेल शहर किक बॉक्सिंग असोसिएशनचे कार्याध्यक्ष व मुख्य प्रशिक्षक सिहान निलेश भोसले यांचे मार्गदर्शन लाभले व विजेता खेळाडूंचे पनवेल शहर किकबॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष परेशशेठ ठाकूर, सचिव मंदार पनवेलकर , रवींद्र म्हात्रे , प्रतीक कारंडे ,वाको महाराष्ट्राची किकबॉक्सिंगचे अध्यक्ष निलेश शेलार यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

# पंढरपूर येथे भव्य वारकरी महाअधिवेशन

## - श्री. सुनील घनवट, हिंदु जनजागृती समिती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




**पंढरपूर :** प्रतिवर्षी लक्षावधी वारकरी आषाढी, कार्तिकीच्या निमित्ताने पंढरपूर येथे श्री विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक होतात. 'लोचनात त्रिभुवन अवघे लेकरांस गवसुन जाय माझी पंढरीची माय, माझी पंढरीची माय', असे म्हणत वारकऱ्यांच्या दिंड्या पंढरपूर येथे विसावत आहेत. वारकरी संप्रदायाचे धर्मकार्य आणि राष्ट्रनिष्ठा ही महाराष्ट्राची खरी ओळख आहे. गेली अनेक शतके वारकरी संप्रदाय नैतिक मूल्ये, संस्कृतीरक्षण आणि देशभक्ती यांची शिकवण देत आला आहे. आजच्या काळातही धर्म, संस्कृती आणि राष्ट्र यांच्या हितासाठी वारकरी समाज अग्रभागी आहे. महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय मोठ्या प्रमाणात असूनही अद्याप पंढरपूर आणि आळंदी येथील तीर्थक्षेत्रांना म्हणाव्या अशा सुविधा नाहीत. याचसमवेत आळंदी येथे प्रस्तावित असलेला कत्तलखाना, वारीत होणारी घुसखोरी, संतांच्या श्लोकांचा चुकीचा अर्थ लावून लोकांची दिशाभूल करणे यांसह अन्य प्रश्नांचा वाचा फोडणे यांसह जाज्वल्य भक्ती अन् राष्ट्रनिष्ठा यांच्या भूमिकेतून, वारकरी ऐक्य साधून महत्त्वाच्या मागण्या शासनाकडे कराव्यात, यासाठी एकादशीला (६ जुलैला) पंढरपूर येथे भव्य वारकरी अधिवेशन घेण्यात येणार आहे.

हे अधिवेशन सद्गुरु श्री गंगागिरी महाराज मठ, भक्तीमार्ग, जनकल्याण हॉस्पिटलच्या शेजारी, पंढरपूर येथे दुपारी १ ते ३.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. महंत गुरुवर्य प.पू. रामगिरी महाराज या अधिवेशनाचे अध्यक्ष असून या अधिवेशनात ज्येष्ठ किर्तनकार संतवीर ह.भ.प. बंडातात्या कराडकर, महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वरशास्त्री महाराज आणि सचिव ह.भ.प. नरहरी महाराज चौधरी, पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थानचे विश्वस्त ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष श्री. शेखर मुंदडा, जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त ह.भ.प. माणिक महाराज मोरे, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, ह.भ.प. छोटे कदम माऊली, ह.भ.प. नरेंद्र महाराज मस्के, श्रीक्षेत्र अपेगाव येथील ह.भ.प. विष्णु महाराज अपेगावकर, अखिल भारतीय संत समितीचे प्रदेश महामंत्री स्वामी भारतानंद सरस्वती महाराज, महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे कोकण प्रांताध्यक्ष ह.भ.प. भगवान महाराज कोकरे, राष्ट्रीय वारकरी परिषदेचे ह.भ.प. मारुति महाराज तुनतुने आणि कार्याध्यक्ष ह.भ.प. बापू महाराज रावकर, हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगडचे राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांसह संत- महंत, ह.भ.प., धर्माचार्य, हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. या अधिवेशनात धर्मरक्षणार्थ कार्यरत धर्मरक्षकांचे सन्मान करण्यात येणार आहेत. तरी या अधिवेशनासाठी मोठ्या संख्येने वारकरी-भाविक यांनी उपस्थित रहावे, तसेच अधिक माहितीसाठी श्री. राजन बुणगे - ९७६२७२१३०४ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

* अधिवेशनात चर्चा केले जाणारे आणि मार्गदर्शन केले जाणारे वारकऱ्यांचे जिव्हाळ्याचे विषय

१. पंढरपूर, देहू, आळंदी, पैठण, मुक्ताईनगर यांसह सर्व तीर्थक्षेत्रे कायमस्वरूपी मद्य आणि मांस यांपासून मुक्त करावीत, तसेच या सर्व तीर्थक्षेत्री १० किलोमीटर परिसरात अहिंदूंच्या धर्मप्रसारावर बंदी आणावी !

२. संत, संत-वाङ्मय, राष्ट्रपुरुष, धर्म, देवता आदींचा अवमान करणाऱ्यांवर कठोर कारवाई होण्यासाठी ईशनिंदा प्रतिबंधक कायदा लागू करावा !

३. संतांच्या श्लोकांचा चुकीचा अर्थ लावून वारीचे वातावरण कलुषित करणाऱ्यांना शासनाने कायमचा प्रतिबंध करावा.

४. गोहत्या आणि गोतस्करी रोखण्यासाठी महाराष्ट्रातील गोहत्या प्रतिबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी !

५. हिंदु युवतींचे रक्षण होण्यासाठी येत्या पावसाळी अधिवेशनात 'लव्ह जिहाद'विरोधी कायदा तात्काळ संमत करावा.

६. इंद्रायणी आणि चंद्रभागा या नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी !

# आशियाई बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने नवनाथ रणखांबे सन्मानित




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** साहित्यिक नवनाथ रणखांबे यांचे शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेले "जीवन संघर्ष" आणि "प्रेम उठाव" या पुस्तकांचा सन्मान आशियाई बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने झाला आहे. या दोन्ही पुस्तकांची प्रसार माध्यमातून जोरदार चर्चा झाली आहे. मराठी साहित्य क्षेत्रात 'प्रेम उठाव' या काव्यसंग्रह पुस्तकावर परिक्षणे, आभिप्राय, समीक्षा कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त समीक्षक, साहित्यातील जाणकार, सुज्ञ वाचक वर्गांनी केली असून ती दर्जेदार दैनिके, साप्ताहिके, मासिके इ. मध्ये प्रकाशित झाली आहे.


प्रेम उठाव या पुस्तकावरील 171 परिक्षणांची ऐतिहासिक विश्वविक्रमाची नोंद आणि जीवन संघर्ष पुस्तकावरील 231 परिक्षणांची ऐतिहासिक नोंद आशियाई बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली आहे. मराठी साहित्य क्षेत्रात एक अनोखे ऐतिहासिक विश्व रेकॉर्ड निर्माण झाले आहे. त्यामुळे नवनाथ रणखांबे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं. ३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं. २०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं. २०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं. २०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं. ४११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# शिवसेना तर्फे ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** सामाजिक बांधिलकी म्हणून कोपरगाव येथे कै. लक्ष्मण पावशे सामाजिक संस्था आणि शिवसेना शाखा क्रमांक ६५ च्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत छत्री वाटप करण्यात आले. माजी नगरसेवक संजय पावशे आणि शाखा संघटक अपर्णा पावशे यांच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या माध्यमातून शिवसेना काम करत असते असेही पावशे यांनी यावेळी सांगितले.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024